ISSN 2394-5303

# Printing Area

Issue-63, Vol-03 March 2020
Peer Reviewed International Refereed Research Journal

Editor
Dr.Bapu G.Gholap

www.vidyawarta.com

Assistant Professor
Matoshri Shantabai Gote
Arts,Commerce & Science College,
Washim Dist. Washim

143

आंतरराष्ट्रीय बहुभाषिक शोध पत्रिका

# प्रिंटिंग एरिया

**Printing Area International Interdisciplinary Research Journal in Marathi, Hindi & English Languages**

March-2020, Issue-63, Vol-03

**Editor**
**Dr. Bapu g. Gholap**
(M.A.Mar.& Pol.Sci.,B.Ed.Ph.D.NET.)

**Co-Editor**
**Dr. Ravindranath Kewat**
(M.A. Ph.D.)

"Printed by: **Harshwardhan Publication Pvt.Ltd.** Published by **Ghodke Archana Rajendra** & Printed & published at Harshwardhan Publication Pvt.Ltd.,At.Post. Limbaganesh Dist,Beed -431122 (Maharashtra) and Editor **Dr. Gholap Bapu Ganpat.**

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205

**Harshwardhan Publication Pvt.Ltd.**
At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed
Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295
harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com

All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com

14) Role of open Prisons in India (An Analytical Study to Rajasthan State)
Narender Kumar, Chandigarh ||69

15) Role of cattle farming for development of rural area-A case study
Dr. Rameshwar Prajapati, Aurangabad, Bihar ||75

16) SOCIOECONOMIC FACTOR AND MALNUTRITION IN CHILD: A CASE-CONTROL ...
PRIYAMBADA DASH & Dr. SRIPADA JOGAJATA TRIPATHY, Nayayagarh ||78

17) Usage of Internet Facilities by users (Faculty Members and Students) at ...
D Ramadasu, Telangana ||81

18) Attrition in Public Sector Banks and Human Resource Management
Vikas Sharma, Barkatulla University ||86

19) A Study of General State and Life Styles of Slum Based Dropout and ...
Dipika Singh, Lucknow ||91

20) वाड्मयाचे लोकतत्त्वीय अध्ययन
डॉ. प्रकाश दुकळे, जि. सांगली ||95

21) दृष्टांतपाठ : महानुभावाचे वाङमयीन व तात्विक विचार
प्रा.डॉ.बाळासाहेब गार्डी, श्रीरामपूर ||98

22) १९४२ च्या "भारत छोडो" आंदोलनातील चिमूरचा लढा
प्रा. डॉ. डी. एन. कामडी, जि. गडचिरोली ||101

23) बुलढाणा पठारावरील पर्यटन स्थळाचे प्रकार व दर्जाचे भौगोलिक विश्लेषण
प्रा. डॉ. दिलीप नि. लांजेवार, वाशिम ||106

24) राजकीय सहभाग - एक अभ्यास
डॉ. संभाजी संतोष पाटील, धुळे ||110

25) [illegible] फुलारी यांच्या बालकादंबरीतील काव्यात्मकता
संतोषकुमार शंकर राठोड, नांदेड ||114

26) लातूर जिल्ह्यातील जल साक्षरता आणि शाश्वत विकास : एक भौगोलिक अभ्यास
विशाल विजयकुमार सोनकांबळे & श्री.डॉ. मुकेश जयकुमार कुलकर्णी ||117

27) भारतीय स्त्री जीवनाचे प्रत्ययकारी भावचित्र : तिची कहाणी
प्रा.डॉ. गजानन जाधव, जाफ्राबाद ||122



www.vidyawarta.com/03 http://www.printingarea.blogspot.com

Assistant Professor
Matoshri Shantabai Gote
Arts Commerce & Science College

23

# बुलढाणा पठारावरील पर्यटन स्थंळाचे प्रकार व दर्जाचे भौगोलिक विश्लेषण

प्रा. डॉ. दिलीप नि. लांजेवार
भूगोल विभाग प्रमुख,
मातोश्री शांताबाई गोटे महाविद्यालय वाशिम

**********

सांराश :–
पर्यटन हे जीवन समृध्द करण्याच्या दृष्टीने महत्वाचे आहे. पर्यटनामूळे दृष्टी विशाल बनते. चार लोकांशी ओळखी होऊन ज्ञानात भर पडते. जीवनातील आनंद आणि चैतन्ययासाठी पर्यटन महत्वाचे ठरते. पर्यटनाच्या दृष्टिकोनातून महाराष्ट्रातील विविध प्रकारची पर्यटन स्थळे बुलढाणा पठारवरील प्रदेशात आढळतात. या प्रदेशाची भूपृष्ठरचना, हवामान, वनस्पती, व प्राणी या नैसर्गिक घटकात विविधता आढळते. शिवाय वाहतूक, दळणवळण, व्यापार, कृषी या घटकांचा विकास होत असल्यामूळे वाहतूक सोयी सुविधांमध्ये वाढ होऊन लहान मोठया पर्यटन स्थळांचा विकास होत असल्याचे दिसून येते. बुलढाणा पठाराचा विस्तार व्यापक स्वरूपाचा असून या प्रदेशावर बुलढाणा, अकोला, वाशिम, यवतमाळ या जिल्हयांच्या काही भागाचा समावेश होतो. त्यामूळे प्रदेशाच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत थोडया फार प्रमाणात सांस्कृतिक घटकात बद्‌ल झाल्याचे आढळते.

**प्रमुख शब्द** :– पर्यटन, प्रकार, वितरण, दर्जा

**प्रस्तावना** :–

२१ व्या शतकात पर्यटन क्षेत्रात आमूलाग्र बद्‌ल होत आहेत. आधीच्या काळात केवळ अमेरीका व युरोपला जाणारे पर्यटक आता जगातील कानाकोपऱ्यात जात आहेत व तिथे प्रचंड प्रमाणात आर्थिक व सांस्कृतिक बद्‌ल घडवून आणत आहे. त्यामूळे दुर्गम भागात देखील पर्यटनामूळे रोजगाराच्या व उद्योगाच्या अनेक नवीन संधी निर्माण होत आहेत. भारतासारख्या विविध सांस्कृती, लोकजीवन आणि संपन्न सांस्कृतिक वारसा लाभलेल्या खंडप्राय देशात परदेशी पर्यटकांना खुणावणारी अनेक जागतिक वारसा स्थळे आहेत.


महाराष्ट्रातील बुलढाणा पठारावर सुध्दा अशी प्रसिध्द व जागतिक स्तरावर ओळख असलेली पर्यटन स्थळे असून लोणार सरोवर, शिरपूर जैन, पोहरादेवी, पैनगंगा अभयारण्य ही काही त्यापैकी प्रसिध्द पर्यटन स्थळे होत. अशीच अनेक धार्मिक, नैसर्गिक, सांस्कृतिक व भौगोलिक पर्यटन स्थळे असून त्या पर्यटन स्थळाच्या प्रकारानूसार वर्गिकरण व दर्जाच्या प्रारूपाचा आढावा घेण्याचा प्रयत्न प्रस्तूत लेखात केला आहे.

**अभ्यास क्षेत्र** :–

बुलढाणा पठार हे महाराष्ट्र राज्याच मध्य–पूर्व भागात असून दख्खनच्या पठाराचा एक भाग आहे. विदर्भ प्रदेशातील बुलढाणा, अकोला, वाशिम व यवतमाळ जिल्हयातील १८ तालूक्यांचा समावेश या पठारी प्रदेशात विस्तारलेला आहे. सह्याद्री पर्वताची एक उपरांग अंजिठा–वेरूळ डोंगररांग या प्रदेशाच्या उत्तर भागातून पूर्वकडे गेली असल्यामूळे हा प्रदेश प्रामुख्याने तापीनदी खोरे व गोदावरी नदी खोऱ्याच्या प्रदेशात विभागला गेला आहे. बुलढाणा पठाराचे क्षेत्रफळ १२६५८ चौ. कि.मी. असून यामध्ये १८ तहसिल विभागाचा समावेश होतो. प्रदेशाचा अक्षवृत्तीय विस्तार २०°.००' ते २०°.४०' उत्तर अक्षांश आणि रेखावृत्तीय विस्तार ७६°.००' ते ७८°.००' पूर्व रेखांश दरम्यान विस्तारलेला आहे. पठाराच्या उत्तरेस पूर्णा नदी खोऱ्याचा प्रदेश, पश्चिमेस जालना जिल्हयातील भोकरदन, जाफराबाद, तालूक्याचा पूर्वभाग नैऋत्येस परभणी जिल्हयातील मंठा तालूक्याचा उत्तर भाग दक्षिणेस हिंगोली जिल्हयातील सेनगाव, हिंगोली, कळमनूरी नांदेड जिल्हयातील हदगाव तालूक्याचा उत्तर भाग आग्नेयस नांदेड जिल्हयातील किनवड व माहूर तालूक्याचा पश्चिम भाग तर पूर्वेस यवतमाळ जिल्हयातील आर्णि, दिग्रस व दारव्हा तालूक्यातील काही भागांच्या सीमा आहेत.



Assistant Professor
Matoshri Shantabai Gote



स्थलदर्शक नकाशा— बुलढाणा पठार

**स्पष्टीकरण :—**

बुलढाणा पठारावरील पर्यटन स्थंळाचे प्रकार व दर्जाचे वितरण या अंतर्गत पठारावरील पर्यटन स्थंळाचे धार्मिक, नैसर्गिक, ऐतिहासीक व सांस्कृतिक या प्रकारात वर्गिकरण करून या अंतर्गत येणाऱ्या स्थंळाविषयी थोडक्यात आढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे. प्रत्येक पर्यटन स्थंळाचे काहीतरी वेगळेपण आहे ते त्या पर्यटन स्थळांच्या आकर्षणाचे केंद्र ठरत असल्याचे दिसून येते. त्याचप्रमाणे पर्यटन स्थळांना शासनामार्फत दिलेला दर्जा व त्यासाठी आवश्यक नियम व अटी यावरून केलेली वर्गवारी मांडण्यात आलेली आहे.

**बुलढाणा पठारावरील पर्यटन स्थंळाचे प्रकार**

बुलढाणा पठारावरील पर्यटन स्थळांचा अभ्यास करत असताना असे आढळून येते की, या प्रदेशात नैसर्गिक, धार्मिक, ऐतिहासिक व सांस्कृतिक पर्यटन स्थळे आहेत. त्यामूळे त्या स्थळांना प्रकारानूसार म्हणजेच नैसर्गिक पर्यटन स्थळांना नदी, सरोवरे, तलाव, डोंगररांगा, डोंगरउतार, सपाट—सखल प्रदेश, जंगले व वनसंपदा हे नैसर्गिक घटक पर्यटन स्थळे निश्चित करण्यासाठी आधारभूत मानली जातात. धार्मिक पर्यटन स्थळांच्या निश्चितेसाठी विविध धर्मांची जसे हिंदू, मुस्लीम, जैन, लिंगायत या धर्मनिहाय वेगवेगळया देवी—देवतांची प्रसिध्द ठिकाणे वर्गिकृत केलेली आहे.

**१) नैसर्गिक पर्यटन स्थळे :—**

पर्यटन हे प्रामुख्याने नैसर्गिक घटकांच्या आकर्षणाशी संबंधित असून पर्यटन विकासाचा प्रमुख आधार आहे. कोणत्याही स्थळांचे नैसर्गिक सौंदर्य हे मानवाच्या मनाला सहज आकर्षित करत असते. नैसर्गिक घटकांमध्ये भूस्वरूप, नदीप्रवाह, हवामान, वनस्पती आणि वन्यप्राणी इत्यादी आकर्षणाचे केंद्र असतात. बुलढाणा पठारावरील पर्यटन स्थळांमध्ये सहस्त्रकुंड धबधबा, लोणार सरोवर, लोणार अभयारण्य, पुसधरण, इसापूर धरण इसापूर अभयारण्य, काटेपूर्णा अभयारण्य, पैनगंगा अभयारण्य ही महत्वाची नैसर्गिक पर्यटन स्थळे आहेत. दाट वनस्पती, डोंगरऱ्या, नदीप्रवाह यामध्ये सुंदर वनक्षेत्र प्रमुख आकर्षण आहे. बुलढाणा पठारावरील अभयारण्यात पर्यटक तासनतास बसून दृश्य सौंदर्यस्थंळाचा आंनद घेतात. पावसाळ्यात पठारावरील हिरवीगार अंजिठा—वेरूळ पर्वतरांग पाहण्यासारखी असते. तसेच पठारावरून पैनगंगा, काटेपूर्णा, अडाण, अरूणावती, पुस, खडकपुर्णा या लहान मोठया नद्या वाहत असून या नंद्यावर धरणे उभारण्यात आलेली आहे. ही कारणे सुध्दा पर्यटनाच्या दृष्टीने उपयुक्त ठरत आहेत.

**२) धार्मिक पर्यटन स्थळे :—**

प्राचीन काळापासून व्यक्ती धार्मिक उद्देशाने प्रेरीत होऊन धार्मिक कार्य व यात्रा करत आला आहे. पर्यटनामध्ये धार्मिक स्थळांना महत्वाचे स्थान आहे. कारण बहूसंख्य पर्यटक धार्मिक उद्देशाने पर्यटनासाठी घराबाहेर पडतात व त्यातूनच इतर प्रकारचे पर्यटन घडून येते. आज धार्मिक महत्व असलेल्या प्रत्येक स्थळाकडे मोठया प्रमाणात लोक आकर्षित होत आहे. या धार्मिक स्थंळाना भेटी देण्याचा उद्देश लौकिक व परलौकिक उदेशामध्ये पापापासून मुक्ती किंवा मोक्ष प्राप्त करण्याचा असतो. प्राचीन काळापासून जगाच्या सर्व भागात या उदेश्याने प्रवास केला जातो या धार्मिक यात्रामध्ये काही अंशी अंधविश्वास व अशिक्षितपणा निश्चितच आढळतो. आज जरी धार्मिक कार्य, यात्रांच्या उदेशांना वैज्ञानिकतेच्या कसोटीमध्ये तोलले जाऊ लागले तरी देखील धार्मिक स्थळे व पर्यटकांच्या संख्येत काहीच फरक पडलेला नाही.

बुलढाणा पठारावर सुध्दा मोठया प्रमाणावर विविध धर्मांची प्रसिध्द धार्मिक स्थळे आहे. आज या धार्मिक स्थळांच्या विकासात भर पडत जाऊन जवळपास

आल्याचे दिसून येते. बुलढाणा पठारावर सर्वच धर्मियांचे कमी अधिक प्रमाणात धार्मिक स्थळे असल्याचे आढळते. पठारावरील वाशिम शहर हे दक्षिण भारतातील काशी म्हणून प्रसिध्द आहे. उत्तर प्रदेशातील अलाहाबाद शहरानंतर सर्वाधिक शिव मंदिरे वाशिम शहरात आहेत. तसेच पठारावर प्राचीन काळापासून देऊळगाव राजा, मेहकर, सैलानी बाबा, चिखली, शिरपून जैन, पोहरादेवी, कारंजा लाड, रिसोड, लोणी, पुसद, लोणार, उमरखेड बुलढाणा इत्यादी ठिकाणी असलेल्या धार्मिक स्थळांना पर्यटक मोठया प्रमाणात भेटी देतात.

**३) सांस्कृतिक व ऐतिहासीक पर्यटन स्थळे :—**

पर्यटनाच्या अनेक आकर्षनापैकी ऐतिहासिक पर्यटन स्थळे एक प्रमुख आकर्षण आहे. एखादी व्यक्ती काही वैयक्तीक कामासाठी एखाद्या ठिकाणी गेली असेल व त्यास त्या ठिकाणी एखादे संग्रहालय, स्मारक, पौराणिक स्थळ, किल्ले, किंवा कर्मभूमी स्थळ याची माहीती मिळाली ती आपल्या कामातून वेळ काढून काही काळ त्या स्थळी जातोच काही पर्यटकांना ऐतिहासीक घटक, घटना, स्थळ याबद्दल कुतूहल व आस्था असते. प्रत्येक व्यक्तीला आपला इतिहास, ऐतिहासिक माहीती मिळविण्याची जिज्ञासा असते. प्रस्तुत अभ्यास क्षेत्रात सिंदखेड राजा सारखे ऐतिहासिक महत्व लाभलेले स्थळ आहे. पर्यटकांच्या इच्छेची पूर्ती प्रत्यक्ष ऐतिहासिक स्थळांना भेट देऊनच होते. त्यामुळे ऐतिहासीक स्थळे मानवाच्या आकर्षणाचे केंद्र आहे. बुलढाणा पठार नैसर्गिक, धार्मिक पर्यटन स्थळांबरोबरच ऐतिहासिक पर्यटन स्थळाच्या दृष्टीने देखील खूप महत्वपूर्ण आहे. या प्रदेशातील वाशिम हे राजा वाकाटकाच्या राजधानीचे शहर म्हणून ओळखले जाते. याशिवाय कांरजा लाड शहराला सुध्दा ऐतिहासिक महत्व लाभलेले आहे.

पर्यटनाचा मुख्य उद्देश सांस्कृतिक जीवनाचा आनंद लुटणे आहे. महाराष्ट्राला जसा धार्मिक व ऐतिहासिक वारसा लाभला आहे तसाच वैभवशाली सांस्कृतिक वारसाही लाभला आहे. महाराष्ट्रात बुलढाणा पठारी प्रदेशात सांस्कृतिक संपत्तीचे मोठे भांडार आहे. संस्कृती हा एक व्यापक शब्द असून त्यामध्ये लोकसंस्कृतीचा आदर्श आणि मूळ सभ्यता सामावली आहे. हे सर्व लोकापर्यंत पसरते, वाढते आणि संपूर्ण लोकांना संस्कारीत करते. कोणते ही स्थान किंवा प्रदेशातील लोक तेथील लोकजीवन, आचार विचारापासून निर्माण होते. लोकसंस्कृतीमध्ये शिल्पकला, स्थापत्यकला, साहित्य, उत्सव इ. येतात. महाराष्ट्रातील लोकसंस्कृतीने एक अद्भूत आकर्षण निर्माण केले आहे. जे पर्यटक आणि इतिहासकारांचे आकर्षणाचे केंद्र आहे. यावरून महाराष्ट्राच्या प्राचीन संस्कृतीचे दर्शन घडून येते. जेथे हा सांस्कृतिक गोष्टी रूजल्या व वाढल्या तेथेच सांस्कृतिक जीवनाचे ठसे उमटले आहेत. यापैकीच बुलढाणा पठाराच्या पूर्वस मोठया प्रमाणात बंजारा समाजाच्या संस्कृतिचे विविध पैलू पहावयास मिळते. या शिवाय आदिवासी बहुल भागात त्या त्या जमातीचे सण, उत्सव आकर्षणाचा बिंदु ठरतात.

**पर्यटन स्थळांचे वर्गिकरण**

| अ.क्र. | पर्यटन स्थळांचे प्रकार | पर्यटनस्थळाची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | नैसर्गिक | ११ | २०.७५ |
| २ | धार्मिक | ३९ | ७३.५८ |
| ३ | सांस्कृतिक व ऐतिहासिक | ३ | ५.६६ |
| | एकूण | ५३ | १०० |

स्त्रोत — क्षेत्रीय कार्य २०१६

**बुलढाणा पठारावरील पर्यटन स्थळांचा दर्जा**

पर्यटन उद्योग हा पर्यटन स्थळी असणाऱ्या विविध प्रकारच्या सोयी सुविधा व तेथील आकर्षणावर अवलंबून आहे. बुलढाणा पठारावरील पर्यटन स्थळांमध्ये जगप्रसिध्द लोणार सरोवर, मराठा साम्राज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांचे आजोळ सिंदखेड राजा, जैन धर्मियाची काशी म्हणून ओळख असलेले शिरपून जैन, सर्वधर्मिय समभावाचे श्रध्दास्थान सैलानी बाबा, इतिहास प्रसिध्द गुरूमंदिर, बंजारा समाजाचे कुलदैवत पोहरादेवी, पैनगंगा नदीवर असणारा सहस्त्रकुंड धबधबा याशिवाय विविध धार्मिक, नैसर्गिक व ऐतिहासिक स्थळांना शासनातर्फे तिर्थक्षेत्र व पर्यटन स्थळांना दर्जा दिलेला आहे

शासननिर्णय: ग्रामविकास व जलसंधारण विभाग शा.नि.क्र.तिर्थ वि.२०११/प्र.क्र.५६/७ योजना७ दि. १२ ऑक्टोबर २०११ यानूसार पर्यटन स्थळांची वर्गवारी करून तिर्थक्षेत्र व पर्यटन स्थानास 'अ' 'ब' 'क' अशी वर्गवारी करण्यात आली आहे. बुलढाणा पठारावरील

शासनाने ठरवून दिलेल्या निकषानूसार पर्यटन स्थळांची वर्गवारी करून पर्यटन स्थंळाचे दर्जानिहाय वर्गिकरण केले आहे.

**बुलढाणा पठारावरील पर्यटन स्थळांचे दर्जानिहाय वर्गिकरण**

| अ.क्र. | पर्यटन स्थळाचा प्रकार | वर्गवारी | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| | | अ | ब | क | |
| १ | धार्मिक | ... | ७ | १७ | २४ |
| २ | ऐतिहासिक | ... | १ | ... | १ |
| ३ | सांस्कृतिक | ... | १ | ... | १ |
| ४ | नैसर्गिक | १ | ..... | १० | ११ |
| | एकूण | १ | ९ | २७ | ३७ |

स्त्रोत — क्षेत्रीय कार्य २०१६

पर्यटन वर्गवारीचा विचार करता असे स्पष्ट होते कि, सर्वाधिक ७३.६८ टक्के पर्यटन स्थळे 'क' दर्जाची असून २३.६८ टक्के 'ब' दर्जाची आहेत तर बुलढाणा पठारावर 'अ' दर्जाचे एकमात्र पर्यटन स्थळ लोणार असल्याचे दिसून येते.

**निष्कर्ष :—**

बुलढाणा पठारावरील पर्यटन स्थंळाचे प्रकार व दर्जाचे भौगोलिक विश्लेषण अभ्यासले असता असे आढळून येते की, बुलढाणा पठारावरील नैसर्गिक, धार्मिक, ऐतिहासिक व सांस्कृतिक पर्यटन स्थळे असली तरी धार्मिक पर्यटन स्थंळाची संख्या सर्वाधिक आहे. लोणार हे एकमेव आंतरराष्ट्रीय स्तरावरील नैसर्गिक पर्यटन स्थळ असून संपूर्ण भारतातूनच नव्हे तर विदेशी पर्यटक सुद्धा कुतूहल, संशोधन, व अभ्यासासाठी मोठया प्रमाणात भेटी देतात. याशिवाय विविध धर्माची काही पर्यटन स्थळे सुद्धा मोठया प्रमाणात धार्मिक पर्यकाला आकर्षित करण्यास कारणीभूत ठरत आहे. बुलढाणा पठारावरील सर्वाधिक प्रसिद्ध पर्यटन स्थळ लोणार असून येथे येणाऱ्या पर्यटकाची संख्या दिवसेंदिवस वाढत असून जगातिल विविध देशातून मोठया संख्येने अभ्यासक पर्यटक भेट देण्यासाठी येतात. त्यामूळे बुलढाणा पठारावरील इतर ही पर्यटन स्थंळाना प्रसिद्धी मिळत आहे.

**सदंर्भग्रथ:—**

१) चंदनकर भिमराव श्रा. (२००९), "पर्यटन आणि यात्रा-व्यापार प्रणाली", मूलगंध प्रकाशन मोर्शी.

२) दास्ताने संतोष (२०००), "महाराष्ट्र", दास्ताने रामचंद्र आणि कंपनी, पुणे.

३) घारपुरे व्हि.टी. (२०१०), "पर्यटन भूगोल", पिंपळापुरे ॲण्ड कं. पब्लिशर्स, नागपूर.

४) बुगदाने सुधाकर, (२०१४), लोणार दर्शन, श्रीराम ऑफसेट, लोणार.

५) रावत ताज (२००४), "पर्यटन का प्रभाव एवं प्रबंधन", तक्षशिला प्रकाशन, दरीयागंज, नई दिल्ली.

६) उद्योजक मासिक जानेवारी (२०२०) महाराष्ट्र उद्योजकता विकास यांचे प्रकाशन, औरंगाबाद पृष्ठ क्रं. ७

❑❑❑

Assistant Professor
Matoshri Shantabai Goto
Arts,Commerce& Science College,
Washim Dist. Washim